सरकार पक्षातर्फे साक्षीदाराचा उर्वरीत सरतपास– श्री. एस. आय. सावंत, वकील.

५. सन २०१२–२०१३ सालामध्ये आरोपींच्या संस्थेत एकूण ३,३९,६५०.१३/– चा अपहार झाला होता. त्यापैकी आरोपींनी ५०,०००/– जमा केल्यामुळे २,८९,६५०.१३/– चा अपहार झाल्याचे निष्पन्न होत होते. सन २०१३–२०१४ मध्ये आरोपींनी रिबेट वाटपामध्ये चुकीचे वैयक्तिक कर्जवाटप, देणगीवाटप, प्रवासखर्च, रोख शिलकीमध्ये अपहार केल्याचे आढळले होते. त्यांनी गोकूळ दूध संघाची व्यापारी पत्रकात चुकीच्या नोंदी घेण्यासह किरकोळ दूध विक्रीच्या व्यापारी पत्रकात कमी नोंदी केल्या होत्या. त्यांनी सरकी पेंडीची व महालक्ष्मी गोल्ड पशुखाद्याची कमी विक्री दाखवली होती. त्यांनी सदर चुकीच्या पध्दतीने एकूण २,६२,६४५/–चा अपहार केला होता. त्यापैकी त्यांनी ९१,२६०/– जास्तीचे जमा केल्यामुळे सदर रक्कम वजा करता १,७१,३८५/– चा अपहार केल्याचे दिसून आले होते.

६. मला सन २०१४–२०१५ च्या आर्थिक वर्षामध्ये आरोपींनी पशुखाद्याचे कमी नग दाखवणे, व्यापारी पत्रकात नमुना दूध विक्री कमी दाखवणे, मान्यतेशिवाय संगणक दुरुस्तीची रक्कम सुदर्शन कॉम्प्युटर यांना देणे, गोकूळ दूध संघाची रिबेट रक्कम आरोपी क्र.१ ने स्वतःकडे घेणे, गोकूळ दूध संघ बिलाची प्रत्यक्ष संकलन केलेल्या रकमेपेक्षा व्यापारी पत्रकात जास्तीची नोंद दाखवणे अशा प्रकारे एकूण २,२४,११५/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते. त्यापैकी आरोपींनी १,४९,६७७/– जमा केले होते. त्यामुळे सदर आर्थिक वर्षात आरोपींनी ७४,४३८/– चा अपहार केल्याचे दिसून आले होते.

७. मला सन २०१५–२०१६ च्या आर्थिक वर्षामध्ये आरोपींनी सरकी पेंडीची खरेदीपेक्षा कमी नोंद घेणे, खरेदीपेक्षा व्यापारी पत्रकात जास्त नोंद घेणे, आरोपी क्र.१ ला सानुग्रह पदाची रक्कम बेकायदेशीर ठरावाने देणे, गोकूळ दूध संघाची रिबेट रक्कम आरोपी क्र.१ ने घेणे, गोकूळ दूध संघ बिलाची प्रत्यक्ष संकलन केलेल्या रकमेपेक्षा व्यापारी पत्रकात जास्तीची नोंद दाखवणे अशा प्रकारे एकूण १,९७,२७२/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते. त्यापैकी आरोपींनी १८,६००/– जमा केले होते. त्यामुळे

सदर आर्थिक वर्षात आरोपींनी १,७८,६७२/– चा अपहार केल्याचे दिसून आले होते.

८. मला सन २०१६–२०१७ च्या आर्थिक वर्षामध्ये आरोपींनी किरकोळ दूध विक्रीची कमी रक्कम दाखवणे, गोकूळ दूध संघाकडून खरेदी केलेल्या गोधारा खताची नोंद न घेणे, सरकी पेंडीच्या चुकीच्या नोंदी घेणे, सन २०१५–२०१६ च्या आर्थिक वर्षातील अखेरची रक्कम कमी दाखवणे अशा प्रकारे एकूण १४,९९९/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते. त्यांनी सदर आर्थिक वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे अखेर शिल्लक १,०१,५८५/– ऐवजी १४,११०/– दाखवून ८७,४७४/– आरोपी क्र.११ महादेव बुगडे याने स्वतःकडे ठेवली होती. त्यानंतर संचालक मंडळाने आरोपी क्र.११ कडून दि. २१.०६.२०१७ रोजी ८७,४०५/– जमा करुन ७०/– कमी घेतले होते. त्यांनी सदर आर्थिक वर्षातील जनरल लेजर मधील आकडे व दूध विक्री खरेदी यातील रकमेत एकूण ३,१०,०००/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते. अशा प्रकारे सदर आर्थिक वर्षात आरोपींनी एकूण ३,३५,९४२/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते.

९. मला सन २०१२ ते २०१७ पर्यंतच्या तपासणीमध्ये आरोपींनी एकूण १०,५०,०८८.०४/– चा अपहार केल्याचे आढळून आले होते. मी सदर बाबी लेखापरीक्षण अहवालात नमूद केल्या होत्या. मी सदरचा अहवाल जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांना सादर केल्यानंतर त्यांनी दिलेल्या मंजूरी प्रमाणे आरोपीं विरोधात आजरा पोलिसांकडे तक्रार नोंदवली होती. मला सन २०१२ ते २०१७ पर्यंतचा मी केलेला लेखापरीक्षण अहवाल दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला तो अहवाल दाखवला, तो तोच असून त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्र. पी.१०५** देण्यात येतो. मी सदर अहवाल तक्रारीसह आजरा पोलिसांना दिल्याबाबत अहवालाच्या शेवटच्या पानावर पोहोच घेतली होती. आता मला ती पोहोच दाखवली, ती तीच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. तिला **नि. क्र. पी.१०६** देण्यात येतो.

१०. आरोपींच्या संस्थेचे सन २०१२ ते २०१५ पर्यंतच्या चार वर्षांचे लेखापरीक्षण

शिवाजी हिंदूराव बंगे, रा. आळवे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांनी केले होते. संस्थेचे सन २०१५ ते २०१६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण विलास ईश्वर होडगे, रा. वडरगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांनी केले होते. त्यांचे अहवाल पोलिसांनी तपासकामी जप्त केले होते. सन २०१२ ते २०१६ पर्यंतचे लेखापरीक्षण संबंधित शिवाजी बंगे व विलास होडगे यांनी निःपक्षपणे केले असते तर त्यांना सदर काळातील संपूर्ण अपहार त्या त्या वर्षी दिसून आला असता.

११. सर्वसाधारणपणे दूध संस्थेचे शेतकरी सभासद एकत्र येऊन नोंदणी करतात. दूध संस्थेची नोंदणी झाल्यानंतर सर्व सभासद एकमताने संचालक मंडळाची निवड करतात. सदर संचालक मंडळ दूध संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी सचिवाची निवड करतात. सचिवाला नियमा प्रमाणे संस्थेच्या कोणत्याही कामाबाबत सर्वप्रथम संचालक मंडळा समोर ठराव मांडावा लागतो. त्यास संचालक मंडळाने अनुमोदन देऊन ठराव मंजूर करण्यात येतो. त्या ठरावा प्रमाणे पुढील कारवाई केली जाते. संस्थेचे सर्व आर्थिक व्यवहारांच्या किर्दीत व जनरल लेजरमध्ये व्हाऊचर प्रमाणे खर्चाच्या नोंदी ठेऊन त्यांचा सांभाळ करण्याची जबाबदारी असते.

१२. संस्थेचे सर्व आर्थिक व्यवहार जवळपास रोखीने केले जातात. त्याबाबत संस्थेचे बँकेतील खाते सचिव अथवा संचालक मंडळाने अधिकार दिलेली व्यक्ती हाताळत असते. गोकूळ दूध संघाकडून प्रत्येक दहा दिवसांनी दूध संघाच्या खात्यामध्ये शेतक-यांनी विक्री केलेल्या दूधाची रक्कम जमा केली जाते. ती रक्कम काढून आणून सचिव शेतक-यांना रोखीने देत असतात. त्याचप्रमाणे गोकूळ दूध संघाकडून सभासदांना दूध वाटपाचा मिळणारा रिबेट देखील त्याच बँक खात्यात जमा केला जातो. संस्थेला दर दहा दिवसांची रोजकिर्द लिहावी लागते. मला तपासणीसाठी आरोपींनी त्यांच्या संस्थेचा सन २०१२-२०१३ चा लेखापरीक्षण अहवाल, रोजकिर्द व जनरल लेजर, सन २०१३-२०१४ चे जनरल लेजर, सन २०१४-२०१५ चे जनरल लेजर व रोजकिर्द, सन २०१५-२०१६ चे जनरल लेजर उपलब्ध करुन दिले नव्हते. त्याबाबतची नोंद मी अहवालामध्ये घेतलेली आहे.

१३. आरोपींनी सन २०१२-२०१३ मध्ये जप्त **मुद्देमालातील अ. क्र.१७** च्या पशुखाद्य रजिस्टर मध्ये दि.३१.०३.२०१३ रोजी गोल्ड पॅलेट पशुखाद्याचे दोन नग, मिठाच्या दोन पिशव्या, सोडयाच्या चार पिशव्या, सरकी पेंडीचे पाच नग शिल्लक असताना ते चुकीच्या पध्दतीने विक्री झाल्याचे दाखवून साठा निरंक असल्याच्या नोंदी घेतल्या आहेत. त्याबाबत त्यांनी रजिस्टरमध्ये खाडाखोड केलेली आहे. सदर विक्री प्रत्यक्षात झाली असती तर त्याच्या किर्दीमध्ये नोंदी आढळून आल्या असत्या. आता मला त्या नोंदी दाखवल्या, त्या माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून त्यातील पशुखाद्याच्या नोंदीला **नि. क्र. पी.१०७,** मिठाच्या नोंदीला **नि. क्र. पी.१०८,** सोडयाच्या नोंदीला **नि. क्र. पी.१०९ आणि** सरकी पेंडीच्या नोंदीला **नि. क्र. पी.११०** देण्यात येतात. सदर विक्रीच्या नोंदीप्रमाणे सचिवाने व्हाऊचर्स तयार करुन ते व्हाऊचर्स फाईलमध्ये ठेवणे गरजेचे होते. परंतु, मला त्याबाबतचे व्हाऊचर्स तपासणीमध्ये आढळून आले नाहीत. आरोपींनी सदर नोंदी नियमा प्रमाणे घेतल्या असत्या तर त्यांनी रोजकिर्द व इतर कागदपत्रे तपासणीसाठी दिली असती.

१४. मला सदर वर्षाच्या तपासणीमध्ये **मुद्देमाल अ. क्र.२३** मधील दि.०३.१०.२०१२ रोजीच्या पावती क्र.६३ प्रमाणे धनंजय किराणा स्टोअर मधून सरकी पेंडीच्या प्रत्येकी ८७९/- च्या दराने १५ नगांची १३,१८५/- रोख खरेदी केल्याची पावती मिळाली होती. परंतु, सदर खरेदीची नोंद आरोपींनी स्टॉक रजिस्टरला घेतली नव्हती. आता मला दाखवलेली पावती क्र.६३ तीच आहे. तिला **नि. क्र. पी.१११** देण्यात येतो. मला पुढे सदर मुद्देमाल रजिस्टरमधील दि.१८.०४.२०१२ रोजीच्या पावती क्र.६८ प्रमाणे धनंजय किराणा स्टोअर मधून सरकी पेंडीच्या प्रत्येकी ७७३/- च्या दराने १० नगांची ७,७३०/- रक्कम होत असून देखील आरोपींनी ३,८६५/- अतिरिक्त देऊन एकूण ११,५९५/- रक्कम दिल्याची पावती मिळाली होती. सदर खरेदीची नोंद आरोपींनी स्टॉक रजिस्टरला घेतली नव्हती. आता मला दाखवलेली पावती क्र.६८ तीच आहे. तिला **नि. क्र. पी.११२** देण्यात येतो. मला पुढे तपासणीमध्ये दि.२२.०८.२०१२ रोजीच्या पावती क्र.९८ प्रमाणे आरोपींनी धनंजय किराणा स्टोअर मधून सरकी पेंडीच्या

प्रत्येकी ८८९/- च्या दराने १५ नगांची १३,३३५/- रोख खरेदी केल्याची पावती मिळाली होती. परंतु, सदर खरेदीची नोंद आरोपींनी स्टॉक रजिस्टरला घेतली नव्हती. आता मला दाखवलेली पावती क्र.९८ तीच आहे. तिला **नि. क्र. पी.११३** देण्यात येतो.

१५. मला सदर तपासणीमध्ये मुद्देमाल अ. क्र.२१ च्या स्टॉक रजिस्टरमध्ये सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षातील संस्थेची किरकोळ दूधविक्री ५,५१,७५४. ४०/- ची असून मुद्देमाल अ. क्र.६३ च्या व्यापारी पत्रकात पा. क्र.४१ वरती किरकोळ दूध विक्रीची ५,४९,५७०.४०/- नोंद दाखवल्याचे आढळून आले होते. सदर नोंदीतील तफावती प्रमाणे आरोपींनी १,९८०/- चा अपहार केल्याचे दिसून आले होते. आता मला मुद्देमाल क्र.६३ च्या व्यापारी पत्रकातील पा. क्र.४१ वरील अ. क्र.६ ची नोंद दाखवली. ती बरोबर असून तिला **नि. क्र. पी.११४** देण्यात येतो.

१६. मला सदर तपासणीमध्ये मुद्देमाल अ. क्र.२२ च्या फाईलमधील सन २०१२-२०१३ या पूर्ण आर्थिक वर्षात आरोपींच्या संस्थेने गोकूळ दूध डेअरीकडे एकूण ८८,८९,१५९.५८/- चे दूध संकलन केल्याचे दिसून आले होते. आता मला ती फाईल दाखवली. तिला **नि. क्र. पी.११५** देण्यात येतो. मला त्याबाबतची आरोपींनी मुद्देमाल क्र.६३ च्या व्यापारी पत्रकातील पा. क्र.४१ वरील अ. क्र.३ मध्ये ८७,०८,३४९.५८/- अशी नोंद घेतल्याचे आढळून आले होते. आता मला ती नोंद दाखवली, सदर नोंद माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.११६** देण्यात येतो. सदर नोंदीप्रमाणे आरोपींनी एकूण १,८०,८१०/- चा अपहार केल्याचे आढळून आले होते.

१७. मला सदर तपासणीमध्ये मुद्देमाल अ. क्र.२३ व २४ च्या फाईलमधील सन २०१२-२०१३ या पूर्ण आर्थिक वर्षातील पशुखाद्यांच्या बिलांच्या तपासणीमध्ये एकूण खरेदी रक्कम १९,५७,९५८/- असून मुद्देमाल क्र.६३ च्या व्यापारी पत्रकातील पा. क्र.४१ वरील कॉलम क्र.२ मधील अ. क्र.६ मध्ये पशुखाद्य खरेदीची १८,७३,२८३/- अशी नोंद घेतल्याचे आढळून आले होते. आता मला ती नोंद दाखवली, सदर नोंद

माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.११७** देण्यात येतो. सदर नोंदीप्रमाणे आरोपींनी एकूण ८४,७०२/– कमी दाखवून अपहार केल्याचे आढळून आले होते.

१८. मला सदर तपासणीमध्ये मुद्देमाल अ. क्र.१७ च्या मिल्क मोअर पशुखाद्याच्या स्टॉक रजिस्टर मधील सन २०१२–२०१३ या आर्थिक वर्षात आरोपींनी दि.१०.११. २०१२ रोजी १० नग पशुखाद्याची खरेदी करुन त्याच दिवशी एका नगाची विक्री दाखवली असून शिल्लक साठा निरंक दाखवल्याचे आढळून आले होते. आता मला त्या नोंदी दाखवल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.११८ व ११९** देण्यात येतात. सदर शिल्लक असलेल्या ९ मिल्क मोअर पशुखाद्याची प्रति नग ९३०/– प्रमाणे होणारी एकूण रक्कम ८,३७०/– आरोपींनी किर्द रजिस्टरला दाखवलेली नाही.

१९. आरोपींच्या संस्थेचा सन २०११–२०१२ च्या रिबेटचे २२,०१६.९७/– सन २०१२–२०१३ मध्ये जमा झाली होती. सदर रक्कम संस्थेच्या आर्थिक वर्षाच्या नफ्यामध्ये दाखवणे गरजेचे असून ती तत्कालीन सचिव आरोपी क्र.१ याने स्विकारल्याचे दिसून आले होते.

२०. मी आरोपींच्या संस्थेचे सन २०१२–२०१३ चे संपुर्ण वर्षाचे पेमेंट रजिस्टर व दूधबिल पेमेंटचे रजिस्टर तपासले होते. त्याप्रमाणे आरोपींनी सदर आर्थिक वर्षाची सभासदांची पेमेंट रक्कम १,५४,६३५.१९/– होत असून व्यापारी पत्रकात १,४९, ७८९.०३/– इतकी जमा दाखवली आहे. आता मला मी तपासलेल्या फाईल्स दाखवल्या, त्या मुद्देमाल अ. क्र.१९ व २० वरती असून त्यातील संपुर्ण नोंदी पडताळलेल्या असून त्या बरोबर आहेत. त्यातील अ. क्र.१९ वरील फाईलला **नि. क्र. पी.१२०/१** व अ. क्र.२० वरील फाईलला **नि. क्र. पी.१२०/२** देण्यात येतो. सदर नोंदीप्रमाणे मुद्देमाल अ. क्र.६३ मधील लेखापरीक्षण अहवालामध्ये आरोपींनी ४,८४६.१६/– कमी घेऊन अपहार केल्याचे दिसून आले होते. आता मला सदर अहवालातील पा. क्र.४१ वरील अ. क्र.२ ची नोंद दाखवली. ती माझ्या तपासणी प्रमाणे

बरोबर असून तिला **नि. क्र. पी.१२१** देण्यात येतो.

२१. मला नि. क्र.१२०/१ व १२०/२ च्या संपुर्ण तपासणीमध्ये सन २०१२-२०१३ च्या दूध खरेदीची रक्कम ८३,३२,४४०.२२/- येत असताना आरोपींनी व्यापारी पत्रकात सदर रक्कम ८३,८२,४४०.२२/- दाखवून ५०,०००/- अतिरिक्त नोंद घेतल्याचे दिसून आले होते. आता मला मुद्देमाल क्र.६३ वरील पा. क्र.४१ मधील कॉलम २ मधील अ. क्र.३ ची दाखवलेली नोंद बरोबर आहे. तिला **नि. क्र. पी.१२२** देण्यात येतो. सदर नोंदी प्रमाणे आरोपींनी सन २०१२-२०१३ मध्ये दूध खरेदीच्या रकमेत एकूण २,८९,६५०.१३/- चा अपहार केल्याचे आढळून आले होते. सदर अपहाराची रक्कम मुद्देमाल क्र.६३ वरील श्री. शिवाजी बंगे यांनी दिलेल्या लेखापरीक्षण अहवालात मिळून आला नाही.

२२. मला सन २०१२-२०१३ च्या रिबेट वाटपाची रक्कम गोकूळ दूध संघाने दिलेले २१,९०३.३१/- आरोपी क्र.१ ने स्विकारल्याचे आढळून आले होते. आता मला नि. क्र.१२०/२ मधील पा. क्र.१५ वरील अ. क्र.२ ची नोंद दाखवली, तिला **नि. क्र. पी. १२३** देण्यात येतो. आरोपी क्र.१ ने सदर रक्कम स्वतः स्विकारण्या ऐवजी संस्थेच्या उत्पन्नात दाखवणे गरजेचे होते. मला आरोपी क्र.१ ने सदर रक्कम संस्थेच्या नफ्यात जमा केल्याचे आढळून आले नाही.

२३. आता मला मुद्देमाल क्र.२७ वरील सन २०१३-२०१४ च्या कर्ज रजिस्टर मधील सभासद सोनाबाई बुगडे हिचे खाते क्र.५०/१४० दाखवले. त्यामध्ये तिला संस्थेने एकवेळा ८,०००/- दिले असून त्याबाबत मुद्देमाल अ. क्र.३० वरील रोजकिर्द मधील पा. क्र.३९ वरती दोन वेळा नोंदी घेतल्याचे दिसून आले होते. आता मला मुद्देमाल क्र.२७ व ३० मधील सदर नोंदी दाखवल्या, त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.१२४ व १२५** देण्यात येतात. मला तपासणीमध्ये तेरीजपत्रकात ४,६४,५००/- ची कर्जवाटप दर्शवलेली असून कर्जवाटप रजिस्टर प्रमाणे ४,५६,५००/- वाटण्यात आले असून त्यामध्ये ८,०००/- चा फरक असल्याचे आढळून आले होते. मला सदर फरक

मुद्देमाल क्र.६४ मधील पा. क्र.३५ मधील तेरीजपत्रक क्र.१ मधील कॉलम क्र.२ मध्ये मेंबरकर्ज येणे या ठिकाणी आढळून आली होती. आता मला ती नोंद दाखवली, ती तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.१२६** देण्यात येतो. त्यावरुन मी सोनाबाई बुगडे या सभासदाला आरोपींनी ८,०००/- चे जास्त कर्ज दिल्याचे भासवल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो होतो.

२४. मला मुद्देमाल क्र.३० पा. क्र.७८ वरील रोजकिर्द मध्ये दि.२१.०१.२०१४ ते ३१.०१.२०१४ या दरम्यान आरोग्य कार्यालयास बोर्ड तयार करुन दिला या सदराखाली ३,९४०/- खर्च दाखवल्याचे दिसून आले होते. त्याप्रमाणे आरोपींनी त्या बाबतचे कोणतेही बिल अथवा व्हाऊचर सादर केलेले नाही. त्यामुळे मी सदर नोंद बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो आहे. आता मला ती नोंद दाखवली. सदर नोंद माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.१२७** देण्यात येतो.

२५. मला मुद्देमाल क्र.३० पा. क्र.४७ वरील रोजकिर्द मध्ये दि.२९.०९.२०१३ ते ३०.०९.२०१३ या दरम्यान संचालक प्रवास या सदराखाली गोकूळ संघाच्या सर्वसाधारण सभेसाठी गेल्याचा ५,५००/- प्रवासखर्च दाखवल्याचे दिसून आले होते. त्याप्रमाणे आरोपींनी त्या बाबतचे कोणतेही बिल अथवा व्हाऊचर सादर केलेले नाही. त्यामुळे मी सदर नोंद बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो आहे. आता मला ती नोंद दाखवली. सदर नोंद माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.१२८** देण्यात येतो.

२६. मला मुद्देमाल क्र.३० पा. क्र.५८ वरील रोजकिर्द मध्ये दि.०१.११.२०१३ ते १०.११.२०१३ या दरम्यान अनामत या सदराखाली १७,०००/- जमा करुन ती पा. क्र.६४ वरील दि.२१.११.२०१३ ते ३०.११.२०१३ या दरम्यान कोणत्याही कारणा शिवाय खर्च दाखवल्याचे दिसून आले आहे. सदर कालावधी दरम्यान संस्थेकडे १५,०००/- रोख शिल्लक असताना १७,०००/- जमा घेण्याचा उद्देश दिसून आला नाही. सदर जमा व खर्चाच्या नोंदी समोर कोणाचेही नाव नाही. त्यामुळे मी सदर नोंद

बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो आहे. आता मला त्या नोंदी दाखवल्या, सदर नोंद माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.१२९ व १३०** देण्यात येतात.

२७. मला मुद्देमाल क्र.३६ मधील गोकूळ दूध संघाने सन २०१३–२०१४ मध्ये प्रत्यक्ष दूध संकलनाचे ९४,८१,३४७.५३/– येत असता, मुद्देमाल क्र.६४ मधील लेखापरीक्षण अहवालातील पा. क्र.३८ वरील व्यापारी पत्रक क्र.४ कॉलम क्र.१ मध्ये अ. क्र.३ वरती ९४,११,३४७.५३/– असे दाखवल्याचे आढळून आले होते. सदर नोंदी प्रमाणे ७०,०००/– चे कमी संकलन दाखवण्यात आले आहे. आता मला सदर मुद्देमाल क्र.३६ व ६४ मधील नोंदी दाखवल्या. त्या माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून मुद्देमाल क्र.३६ मधील नोंदीला **नि. क्र. पी.१३१** व मुद्देमाल क्र.६४ मधील नोंदीला **नि. क्र. पी.१३२** देण्यात येतो.

२८. मला मुद्देमाल क्र.३० मधील पा. क्र.८४ वरील दि.२१.०२.२०१४ ते २८.०२.२०१४ या कालावधी मधील मशिनरी दुरुस्ती या सदराखाली पेन्सीलने नोंद करुन १२,०००/– खर्ची दाखवल्याचे दिसून आले होते. त्याबाबत आरोपींनी कोणतेही बिल अथवा व्हाऊचर सादर केले नव्हते. त्यास संचालक मंडळाची मंजूरी नसल्याचे दिसून आल्यामुळे ती बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत मी आलो आहे. आता मला सदर नोंद दाखवली, ती माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून तिला **नि. क्र. पी.१३३** देण्यात येतो.

२९. मला मुद्देमाल क्र.३७ मधील सन २०१३–२०१४ च्या किरकोळ दूध विक्रीच्या फाईल प्रमाणे ८,८३,१९५.६०/– विक्री झालेली असून मुद्देमाल क्र.६४ वरील लेखापरीक्षण अहवाल पा. क्र.३८ मधील कॉलम क्र.१ च्या अ. क्र.५ ला ५,६४,००३.४०/– नोंदल्याचे आढळून आले होते. सदर नोंदींप्रमाणे विक्री रकमेपेक्षा १,१९,१९२.२०/– कमी असल्याचे दिसून आले होते. त्यावरुन मी सदर नोंदी बनावट असल्याच्या निष्कर्ष काढलेला आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर आहेत.

मुद्देमाल क्र.३७ ला **नि. क्र.१३४** व मुद्देमाल क्र.६४ मधील पा. क्र.३८ वरील किरकोळ स्थानिक दूधविक्रीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१३५** देण्यात येतो.

३०. मला मुद्देमाल क्र.२८ मधील दि.२१.११.२०१३ ते ३०.११.२०१३ या दरम्यान दोन सरकी पेंड प्रत्येकी ८३५/- प्रमाणे विक्री केल्याचे दिसून आले होते. परंतु, त्या प्रमाणे मुद्देमाल क्र.१७ मधील दि.१०.१२.२०१२ पर्यंतच्या नोंदीप्रमाणे आरोपींच्या संस्थेत कोणताही साठा उपलब्ध नसल्याचे दिसून आले होते. यावरुन मी आरोपींनी दोन बॅग विक्री केल्याची बनावट नोंद घेतल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो होतो. आता मला मुद्देमाल क्र.२८ व १७ मधील सदर नोंदी दाखवल्या. त्या माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून मुद्देमाल क्र.२८ मधील नोंदीला **नि. क्र. पी.१३६/१ व १३६/२** आणि मुद्देमाल क्र.१७ ला (*केवळ या नोंदी करीता संपुर्ण रजिस्टरला एकत्रीतपणे*) **नि. क्र. पी.१३७** देण्यात येतो.

३१. मला मुद्देमाल क्र.२९ मधील दि.३१.०३.२०१४ रोजीच्या नोंदीमध्ये महालक्ष्मी गोल्ड पशुखाद्याच्या प्रती नग ८६०/- प्रमाणे सर्व ६४ नगांची विक्री करुन ५५, ०४०/- जमा दाखवले असून त्याचवेळी मुद्देमाल क्र.१७ (नि. क्र.१३७) दि.३१.०३. २०१४ रोजीच्या नोंदीमध्ये खाडाखोड करुन तेथे ६८ नग विक्री दाखवून शिल्लक निरंक असल्याचे दाखवले आहे असे दिसून आले होते. सदर दोन्ही नोंदी नुसार प्रती नग ८६०/- प्रमाणे ४ नगांचा ३,४४०/- चा फरक दिसून आल्यामुळे मी त्या नोंदी बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो आहे. आता मला त्या नोंदी दाखवल्या, त्या माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर आहेत. मुद्देमाल क्र.२९ मधील दि.३१.०३.२०१४ च्या नोंदीला **नि. क्र. पी.१३८** आणि मुद्देमाल क्र.१७ मधील दि.३१.०३.२०१४ रोजीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१३९** देण्यात येतो.

३२. मला मुद्देमाल क्र.३० मधील पुर्ण नोंदीचे अवलोकन केल्यानंतर आरोपींनी पशुखाद्य खरेदी रक्कम २१,१४,२५८/- खरेदी केल्याचे दाखवले असून मुद्देमाल क्र. ६४ मधील व्यापारी पत्रक पा. क्र.३८ च्या कलम २ मधील अ. क्र.५ वरील नोंदीत

पशुखाद्य खरेदी म्हणून २१,९५,५१८/- दाखवून मूळ खरेदीपेक्षा ८१,२६०/- जास्तीचे दाखवल्याचे आढळून आले होते. त्यामुळे मी आरोपींनी सदर खरेदीत ८१,२६०/- चा अपहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर आहेत. त्यामुळे मुद्देमाल क्र.३० (संपूर्ण रजिस्टरला) **नि. क्र. पी.१४०** आणि मुद्देमाल क्र.६४ मधील पा. क्र.३८ वरील नोंदीला **नि. क्र. पी.१४१** देण्यात येतो.

३३. मला मुद्देमाल क्र.३२ मधील सन २०१३-२०१४ च्या संस्थेने सभासदांना केलेल्या पेमेंट रजिस्टरमध्ये दूध खरेदी ९१,१८,६३५.८६/- असून मुद्देमाल क्र.६४ वरील लेखापरीक्षण अहवाल पा. क्र.३८ मधील कॉलम क्र.२ च्या अ. क्र.२ ला दूध खरेदीचे ९१,२८,६३५.८६/-नोंदल्याचे आढळून आले होते. सदर नोंदींप्रमाणे खरेदी रकमेपेक्षा १०,०००/- जास्तीचे नोंदवल्याचे दिसून आले होते. त्यावरुन मी सदर नोंदी बनावट असल्याच्या निष्कर्ष काढलेला आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर आहेत. त्यामुळे मुद्देमाल क्र.३२ (संपूर्ण फाईल) ला **नि. क्र. पी.१४२** व मुद्देमाल क्र.६४ मधील पा. क्र.३८ वरील दूध खरेदी नोंदीला **नि. क्र. पी.१४३** देण्यात येतो. अशा प्रकारे मला सन २०१३-२०१४ च्या कालावधीत आरोपींनी एकूण १,७१,३८५.३१/- चा अपहार केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे मी सदर बाब माझ्या अहवालामध्ये नोंदवलेल्या आहेत.

सरतपास अपुर्ण.

(न्यायालच्या प्रथम सत्राची वेळ संपल्यामुळे सरतपास दुपार सत्रा पर्यंत तहकूब.)

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३१.०७.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

३४. मला सन २०१४-२०१५ च्या तपासणी दरम्यान मुद्देमाल क्र.१८ च्या रजिस्टर मधील नोंदी प्रमाणे सरकी पेंडीचे एकूण ५०७ नग खरेदी केलेले असून ५१६ नग विक्री

दाखवल्याचे दिसून आले होते. परंतु, मुद्देमाल क्र.४४ च्या व्हाऊचर फाईल मधील पशुखाद्य खरेदीच्या बिलांप्रमाणे आरोपींनी एकूण ५२७ नग पेंडीची खरेदी केली आहे. यावरुन मी सदर नोंदी बोगस असल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.१८ मधील सरकी दि.०१.०४.२०१४ ते ३१.०३.२०१५ पर्यंतच्या नोंदीना एकत्रीतपणे **नि. क्र. पी.१४४** आणि मुद्देमाल क्र.४४ च्या संपूर्ण व्हाऊचर फाईलला **नि. क्र. पी.१४५** देण्यात येतो.

३५. मला मुद्देमाल क्र.४३ च्या संपूर्ण वर्षाच्या नमुना दूध विक्रीच्या रोजकिर्दची पडताळणी केली असता, त्याची एकूण रक्कम १,९५,१५३.२६/– असून मुद्देमाल क्र.६५ वरील व्यापारी पत्रकाच्या पा. क्र.४३ वरील कॉलम १ अ. क्र.२ वरील नमुना दूध विक्रीची रक्कम १,८०,०१०.२५/– असल्याचे आढळून आले होते. मी सदर नोंदी मुद्देमाल क्र.४३ मधील नोंदीशी पडताळून पाहिले असता, मला त्यामध्ये १५,१४३. ०१/– चा फरक दिसून आला होता. मला त्याबाबत आरोपींनी तपासणीसाठी सन २०१४–२०१५ ची रोजकिर्द व जनरल लेजर उपलब्ध करुन दिले नव्हते. त्यामुळे मी सदर रकमेचा आरोपींनी अपहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.४३ (संपूर्ण फाईल) **नि. क्र. पी. १४६** आणि मुद्देमाल क्र.६५ मधील पा. क्र.४३ वरील कॉलम क्र.१ मधील अ. क्र.२ च्या नमुना दूध विक्रीच्या नोंदीस **नि. क्र. पी.१४७** देण्यात येतो.

३६. मला मुद्देमाल क्र.४४ (नि. क्र.१४५) मधील सुदर्शन कॉम्प्युटर्सची ५,२३०/– व ७,४००/– च्या दोन बिलांची रक्कम देण्याबाबत संस्थेचा ठराव आणि रोजकिर्द उपलब्ध करुन देण्यात आली नसल्यामुळे मी सदर बिले बनावट असल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे त्या बिलांना अनुक्रमे **नि. क्र. पी.१४८ व १४९** देण्यात येतात.

३७. मला मुद्देमाल क्र.२० मधील पा. क्र.१२ वरील सन २०१३–२०१४ च्या रिबेट बाबत दि.१४.१०.२०१४ रोजीच्या खाते क्र.१६२ मध्ये २३,९४६.६०/– ही रक्कम

गोकूळ संघाने आरोपींच्या संस्थेला जमा केल्याचे दिसून येत असून ती रक्कम आरोपींनी संस्थेच्या आर्थिक वर्षाच्या नफ्यामध्ये दाखवणे गरजेचे होते. परंतु, ती तत्कालीन सचिव आरोपी क्र.१ याने स्विकारल्याचे दिसून आले होते. त्यामुळे मी सदर रकमेचा अपहार झाल्याच्या निष्कर्षा पर्यंत पोहोचलो होतो. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.२० मधील खाते क्र.१६२ च्या नोंदीला **नि. क्र. पी.१५०** देण्यात येतो.

३८. मला मुद्देमाल क्र.४० च्या संपूर्ण फाईलचे अवलोकन केल्यावर, गोकूळ संघाने आरोपींच्या संस्थेला सन २०१४–२०१५ या कालावधीत १,०६,१९,४००.२८/– इतकी रक्कम अदा केल्याचे निष्पन्न झाले असून मुद्देमाल क्र.६५ मधील व्यापारी पत्रकातील नोंदी प्रमाणे आरोपी संस्थेने १,०४,६७,३६४.२८/– मिळाल्याचे दर्शवले असल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये १,५२,०३६/– रुपयांची तफावत आढळून आल्यामुळे मी सदर रकमेचा आरोपींनी गैरव्यवहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.४० (संपूर्ण फाईल) ला **नि. क्र. पी.१५१** आणि मुद्देमाल क्र.६५ मधील पा. क्र.४३ वरील कॉलम १ मधील अ. क्र.३ च्या संघ दूध विक्रीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१५२** देण्यात येतो.

३९. मला मुद्देमाल क्र.४४ (नि. क्र.१४५) व मुद्देमाल क्र.४५ वरील व्हाऊचर्स फाईलची तपासणी केली असता, त्यामध्ये पशुखाद्य खरेदीचे एकूण बिल २१,६५, ८०१/– असून मुद्देमाल क्र.६५ वरील पा. क्र.४३ मधील कॉलम क्र.२ मधील अ. क्र.६ च्या पशुखाद्य खरेदी या सदरातील नोंदीत २१,६८,७५१/– असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे मी व्यापारी पत्रकामध्ये २,९५०/– जास्तीचे दाखवून आरोपींनी अपहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असून मुद्देमाल क्र.४५ च्या संपूर्ण फाईलला **नि. क्र. पी. १५३** आणि मुद्देमाल क्र.६५ वरील पा. क्र.४३ मधील कॉलम क्र.२ मधील अ. क्र.६ च्या पशुखाद्य खरेदी या सदरातील नोंदीला **नि. क्र. पी.१५४** देण्यात येतो.

४०. मी मुद्देमाल क्र.३९ च्या सन २०१४–२०१५ च्या पशुखाद्य विक्री रजिस्टरची तपासणी केली असता, त्यामध्ये २१,१२,०९०/– ची विक्री झाली असून मुद्देमाल क्र.६५ मधील व्यापारी पत्रकातील नोंदी प्रमाणे आरोपी संस्थेने २१,२८,०३०/– मिळाल्याचे दर्शवले असल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये १५,९४०/– जास्तीचे आढळून आले असून त्याबाबतची आरोपींनी रोजकिर्द व जनरल लेजर उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे मी व्यापारी पत्रकात चुकीची रक्कम नमूद करुन आरोपींनी अपहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.३९ (संपूर्ण रजिस्टर) ला **नि. क्र. पी.१५५** आणि मुद्देमाल क्र.६५ मधील पा. क्र.४३ वरील कॉलम १ मधील अ. क्र.८ च्या पशुखाद्य विक्रीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१५६** देण्यात येतो.

४१. मी मुद्देमाल क्र.४१ च्या सन २०१४–२०१५ च्या डेअरी रजिस्टरची तपासणी केली असता, त्यामध्ये दूध खरेदीचे १,०१,९०,९९६.५४/– ची खरेदी झाली असून मुद्देमाल क्र.६५ मधील व्यापारी पत्रकातील नोंदी प्रमाणे आरोपी संस्थेने १,०४,५०, ९९६.५४/– ची खरेदी दाखवली आहे. त्याप्रमाणे व्यापारी पत्रकामध्ये १,३०, ०००/– जास्तीचे दाखवले असून त्याबाबतची आरोपींनी रोजकिर्द व जनरल लेजर उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे मी व्यापारी पत्रकात चुकीची रक्कम नमूद करुन त्यांनी अपहार केल्याच्या निष्कर्षा पर्यंत आलो आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर असल्यामुळे मुद्देमाल क्र.४१ (संपूर्ण रजिस्टर) ला **नि. क्र. पी.१५७** आणि मुद्देमाल क्र.६५ मधील पा. क्र.४३ वरील कॉलम २ मधील अ. क्र.२ च्या दूध खरेदीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१५८** देण्यात येतो. माझ्या नि. क्र.१०५ च्या अहवालातील पा. क्र.१९ मधील रकाना क्र.३० मध्ये टंकलेखनाच्या दोषामुळे दूध खरेदीच्या रकमेमध्ये १,०१, ९०,९९६.५४/– ऐवजी १०,१९,९९६.५४/– असे नमूद झाले आहे.

४२. मला मुद्देमाल क्र.४२ मधील सन २०१४–२०१५ च्या किरकोळ दूध विक्रीच्या फाईल प्रमाणे ८,४२,२२७.८०/– विक्री झालेली असून मुद्देमाल क्र.६५ वरील

लेखापरीक्षण अहवाल पा. क्र.४३ मधील कॉलम क्र.१ च्या अ. क्र.६ वरील किरकोळ स्थानिक दूध विक्रीच्या नोंदीमध्ये ८,४३,०१५.३०/– नोंदल्याचे आढळून आले होते. सदर नोंदींप्रमाणे विक्री रकमेपेक्षा ७८७.५०/– जास्तीचे असल्याचे दिसून आले होते. त्यावरुन मी सदर नोंदी बनावट असल्याच्या निष्कर्ष काढलेला आहे. सदर नोंदी माझ्या तपासणी प्रमाणे बरोबर आहेत. मुद्देमाल क्र.४२ (संपूर्ण फाईल) ला **नि. क्र.१५९** व मुद्देमाल क्र.६५ मधील पा. क्र.४३ वरील किरकोळ स्थानिक दूधविक्रीच्या नोंदीला **नि. क्र. पी.१६०** देण्यात येतो. मला सन २०१४–२०१५ च्या आर्थिक वर्षात आरोपींनी ७४,४३८.११/– ची अफरातफर केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर अपहाराची रक्कम मुद्देमाल क्र.६५ वरील श्री. शिवाजी बंगे यांनी दिलेल्या लेखापरीक्षण अहवालात मिळून आला नाही.

सरतपास अपुर्ण.

(न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे सरतपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३१.०७.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.